MARATHI

PAPER—II

(LITERATURE)

Time Allowed : Three Hours

Maximum Marks : 250

QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS

Please read each of the following instructions carefully before attempting questions

There are EIGHT questions divided in two Sections.

Candidate has to attempt FIVE questions in all.

Question Nos. **1** and **5** are compulsory and out of the remaining, THREE are to be attempted choosing at least ONE question from each Section.

The number of marks carried by a question/part is indicated against it.

Answers must be written in MARATHI.

Word limit in questions, wherever specified, should be adhered to.

Attempts of questions shall be counted in sequential order. Unless struck off, attempt of a question shall be counted even if attempted partly. Any page or portion of the page left blank in the Question-cum-Answer Booklet must be clearly struck off.

Optional Province · optionalprovince.com

SECTION—A

1. पुढील **पाच** उताऱ्यांचे प्रत्येकी *150* शब्दांत रसास्वादपूर्वक सटीक स्पष्टीकरण करा : 10×5=50

(a) पंडिता : आतां पुसों नको : आतां अति सम्येक वर्तत असे : आतां तुम्हां पांचांस्यां गुरुकुळातें हात जोडूनि म्हणत असें : गोसावियांचा व्यापार चालवितां कोण्हा माझें वेकास गेलें असैल : तरि तुम्हीं समस्तीं क्षेमा करावी :

(b) यावरून निर्मीकानें मानवप्राण्यांस जी कांहीं अत्युत्तम **सारासार विचार करण्याची बुद्धि** दिली आहे, तिजपासून त्याला एकंदर सर्व कामीं दिवसानुदिवस ज्यास्ती सुधारणा करितां येईल.

(c) स्त्रीनें अविवाहित असतां मातृत्व पत्करलें तर तें वस्तुतः पाप नाहीं. तें पाप समजलें जातें याचें कारण त्याचा परिणाम इष्ट होत नाहीं हें होय. स्त्री लग्नाशिवाय पुरुषापाशी राहिली तर त्या स्त्रीला पुरुषाच्या इस्टेटीवर अधिकार उत्पन्न होत नाहीं; व त्या स्त्रीपासून उत्पन्न होणाऱ्या प्रजेस बापाच्या इस्टेटीवर हक्क उत्पन्न होत नाहीं; म्हणून विवाहाशिवाय प्रजोत्पत्ति निवेदिली गेली आहे.

(d) ''तुमचा शत्रू तुम्हांला स्वच्छ दिसतो, समोर दिसतो. आमचे शत्रू बाहेर कुणीच नसतात... आमच्या प्रिय व्यक्ती याच आम्हांला शत्रुवत वाटतात...त्यांच्यावर चवताळणं, क्रूर वाग्बाणांनी त्यांना घायाळ करणं, हेच आमचे पराक्रम... आणि गळणाऱ्या रक्ताकडं पाहून पश्चात्तापानं तडफडणं, जळत राहणं, हीच आमची दिनचर्या !''

(e) मला नेहमी वाटतं की शिकार म्हणून जर गेलो नसतो तर पुढचा पेचप्रसंग आला नसता. पण म्हणतात ना होणारी ती काही केल्या टळणारे नसते व जे जे व्हईल ते ते माणसाने बघितले पाहिजे, त्याला टाळता येत नाही. मला नेहमी वाटत आलेलं आहे की, शिकार करायला गेलो नि शिकार होऊन आलो.

2. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) 'स्मृतिस्थळ' या ग्रंथाची ठळक वैशिष्ट्ये सांगून त्यातील स्मृतींद्वारे तत्कालीन राजकीय-सामाजिक इत्यादी विषयांशी संबंधित असलेला जीवनाचा पट आपल्यासमोर कशा प्रकारे उलगडला जातो, ते साधार सांगा. 15

(b) ''म फुले यांनी 'शेतकऱ्याचा असूड' या पुस्तकात तत्कालीन शेतकऱ्यांच्या अवनतस्थितीचे चित्र रेखाटून त्या स्थितीची मूलगामी मीमांसा केली आहे.'' या संदर्भात साधार चर्चा करा. 15

(c) विविध प्रकारच्या सामाजिक, आर्थिक, नैतिक चर्चांच्या संदर्भात दिलेल्या अवतरणांमुळे 'ब्राह्मणकन्या' ही कादंबरी वेगळी उठून दिसत असली तरीही ती त्याचमुळे कादंबरीच्या रूपबंधापासून मात्र दूर जाते, असे तुम्हाला वाटते का याविषयीची साधार चर्चा करा. 20

3. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) 'साष्टांग नमस्कार' ही नाट्यकृती विनोदाच्या विविध रूपांचा आविष्कार कशा प्रकारे करते, ते सोदाहरण अधोरेखित करा. 15

(b) ''उद्धव शेळके यांचा 'शिळान' ह्या पहिल्या कथासंग्रहातील वैदर्भीय ग्रामीण जीवनाच्या सूक्ष्म चित्रणामुळे व बोलीच्या वापरामुळे वैशिष्ट्यपूर्ण ठरला.'' या विधानाची यथार्थता तपासा. 15

(c) ''बागुलांच्या कथा कथावाङ्मय प्रकाराशी संबंधित असलेल्या लोकप्रिय कल्पना उधळून लावणाऱ्या आहेत .... त्यांचे बळ त्यांच्यातून सळसळणाऱ्या चैतन्यात सामावलेले असते.'' ह्या विधानाच्या आधार 'जेव्हा मी जात चोरली होती' या संग्रहाच्या संदर्भात चर्चा करा. 20

Optional Province · optionalprovince.com

4. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) 'जन हे वोळतु जेथे' या कादंबरीत व्यक्तीचे समष्टीशी एकरूप होणे वेगवेगळ्या प्रकारे आविष्कृत झाले आहे—या मताची साधार चिकित्सा करा. 15

(b) 'एकेक पान गळावया' या संग्रहातील लघुकादंबऱ्यांच्याद्वारे लेखिकेला आविष्कृत करता आलेल्या अनुभवांचे आणि जीवनदृष्टीचे वेगळेपण अधोरेखित करा. 15

(c) 'आठवणींचे पक्षी' हे मराठीमधील एक प्रभावी व यशस्वी आत्मकथन ठरण्याची कारणे कोणती आहेत, असे तुम्हाला वाटते ह्या विषयाशी संबंधित सकारण चर्चा करा. 20

SECTION—B

5. पुढील **पाच** उताऱ्यांचे प्रत्येकी *150* शब्दांत रसास्वादपूर्वक सटीक स्पष्टीकरण करा : 10×5=50

(a) मंदाकिनीमधिल जी कनकारविंदें।
तीं जेवितों मृदुलनालमृणालकंदें।
आम्ही असों नृपसुते तरि कांचनाचे।
जें कार्य तें धरिल कीं गुण कारणाचे॥

(b) दो दिवसांची तनु ही साची सुरतरसाची करूनि मजा।
गमजा करितां मनिं उमजाना हें सुख न पुढें पडेल वजा॥ भाइ सावध व्हा॥

(c) सुंदरतेच्या मोहनांत मन अमुचेंही नाचे;
बंधहि होतीं शिथिल, हरपतें भनहि जगताचें.
जीव ओढतो वरवर जाया चैतन्यापाठीं;
हाय ! सुटेना दृढ देहाची परि बसली गांठी !

(d) ध्येय, प्रेम, आशा यांची
होतसे का कधी पूर्ती
वेड्यापरी पूजतो या
आम्ही भंगणाऱ्या मूर्ती !

(e) जात, वर्ण, धर्माचे नद्या-डोंगर ओलांडून ज्ञानोबा तुम्हाला
अमृतानुभवाकडे जाता आले नाही
ताटी लावून जसे पहिल्यांदा रुसून बसलात ते रुसणे
कायमच राहिले.

6. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) अभ्यासक्रमात अंतर्भूत केलेल्या नामदेवांच्या अभंगवाणीच्या आधारे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे कोणकोणते विशेष कशा प्रकारे प्रकट झाले आहेत, ते सोदाहरण स्पष्ट करा. 15

(b) 'पैंजण' मधील लावण्यांमधून कवींच्या सौंदर्यदृष्टीची वैशिष्ट्ये कशा प्रकारे आविष्कृत झाली आहेत ह्या विषयाची समीक्षा करा. 15

(c) पंडिती काव्याची कोणकोणती वैशिष्ट्ये रघुनाथपंडितांच्या 'दमयंतीस्वयंवरा' मध्ये पाहावयास मिळतात, ते साधार सांगा. 20

Optional Province · optionalprovince.com

7. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) बालकवींच्या कवितेत रोमँटिसिझममधील कोणकोणत्या वृत्तिविशेषांचा कशा प्रकारे आविष्कार झाला आहे, ते साधार लिहा. 15

(b) 'विशाखा' तील कवितांद्वारे आविष्कृत झालेल्या कवीच्या सामाजिक व राष्ट्रीय जाणिवांची विस्ताराने चर्चा करा. 15

(c) विंदा करंदीकर यांच्या 'मृद्‌गंध' या संग्रहामध्ये विविध अनुभवांचा व जाणिवांचा प्रभावी आविष्कार झाला आहे. विधानाची चिकित्सा करा. 20

8. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) नारायण सुर्वे यांच्या 'जाहीरनामा' संग्रहामधील कवितेचे वेगळेपण वैयक्तिकता तसेच वर्गरेषा यांत सामावले आहे अशी भूमिका घेऊन विस्ताराने चर्चा करा. 15

(b) ''ग्रेस यांची कविता केवळ त्यांच्या आंतरिक वास्तवातूनच आकार धारण करते, तिचा समकालीन वास्तवाशी कोणताही संबंध नाही.'' या विधानाची साधार चिकित्सा करा. 15

(c) 'या सत्तेत जीव रमत नाही' या संग्रहामध्ये कवीचा भर समूहलक्ष्यी जाणिवांपेक्षा अस्तित्वलक्ष्यी जाणिवांवर अधिक आहे, हे मत तुम्हाला पटते का? या प्रश्नाशी संबंधित सकारण उत्तर लिहा. 20

★ ★ ★

Optional Province · optionalprovince.com